# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 03/05/2021 (सोमवार)
(दुपार)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक
### पोलिस स्टेशन केळवद ची कारवाई

आज दिनांक 03/05/2021 रोजी पोउपनि अर्जुन राठोड हे पो.स्टे. केळवद ला हजर असताना त्यांना मुखबिरद्वारे विश्वनिय गुप्त माहीती मिळाली कि टाटा मॅजिक गाडी क्र. एम एच 14 डी.एम–9423 मध्ये सावळी येथुन जनावरे भरुन कत्तली करीता नागपुर ला जनावरे घेउन जाणार आहे. या खबरे वरुन पोउपनि अर्जुन राठोड हे स्टाफसह सावळी फाटा येथे पोहचुन नाकाबंदी केली असता सावळी गावाकडुन सकाळी 05.00 वा. चे सुमारास एक चारचाकी गाडी नाकाबंदीच्या दिशेने येतांना दिसली. सदर वाहन हे नाकाबंदीचे काही अंतरावर थांबवुन सदर वाहनातील 3 इसम अंधाराचा फायदा घेउन पळु लागले त्यामुळे पोलिसांनी त्यांचा पाठलाग केला असता वाहनातील 1 इसम हा मिळुन आला त्यास ताब्यात घेउन त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव नौशाद रफिक शेख वय–31 वर्ष रा– सावळी तह– सावनेर असे सांगितले. आरोपीच्या गाडीची पाहणी केली असता वाहनाचे मागील डाल्यामध्ये जनावरे दाटीवाटीने कोंबुन आकुड दोरीने पाय व तोंड बांधुन दिसल्यामुले डाल्यामध्ये 2 नग कालवड गाई गौवंश कि. 14,000/– रु. व 5 नग बैल गोरे गौवंश कि. 40,000/– रु चे जनावरांना अत्यंत क्रुर व निर्यदयतेने डांबुन आकडुन दोरीने पाय व तोंड बांधुन चारा पाण्याची सोय न करता कोबुंन दाटीवाटीने अपुऱ्या जागेत ठेवुन कत्तली साठी अवैध्य रीत्या वाहतुक करतांना मिळुन आला. आरोपीच्या ताब्यातुन जनावरे व वाहनासह असा एकुण किमती 3,54,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेले आहे.

पोलीस स्टेशन केळवद येथे आरोपीतांविरूद्ध अप क्र. 76/2021 कलम 34 भादवी सहकलम–11(1)(घ)(ड)(च) प्राण्यांना निर्दयतेने वागवने प्रति अधि.1960 सहकलम– 5(अ), 9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम –1995 सहकलम– 119 मपोका सहकलम–192(अ) मो वा.का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन यातील आरोपी नामे 1)नौशाद रफिक शेख वय–31 वर्ष रा– सावळी तह–सावनेर यास सुचनापत्रावर सोडण्यात आले असुन फरार आरोपी नामे– सावनेर 2) गाडी चालक नामे मोहम्मद फैजान कुरेशी व त्याचा सोबती 3) मोहम्मद जमील अब्दुल रकिम दोन्ही रा– नागपुर यांचा शोध सुरु असुन पुढील तपास पोउपनि अर्जुन राठोड पो.स्टे केळवद हे करीत आहेत.

सदरची कार्यवाही मा. श्री राकेश ओला, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा.,मा.श्री राहुल माकनीकर, अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा.,मा. श्री अशोक सरबंळकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि अर्जुन राठोड, पोशि धोंडुतात्या देवकत्ते, पोशि सचिन येळकर, चानापोशि गुणवंता डाखोळे यांनी केली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर